क्रमांक. बीपीए १०८९/पीआरओ-२,
गृह विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२,
दिनांक ६ जुलै १९८९.

प्रति,

१] आयुक्त,
दारूबंदी व उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२] सर्व जिल्हाधिकारी.

३] सर्व अधीक्षक,
दारूबंदी व उत्पादन शुल्क.

विषय:- देशी व विदेशी दारूच्या किरकोळ विक्रीच्या दुकानासाठी नवीन अनुज्ञप्त्या देण्यासंबंधीचा निर्णय स्थगित ठेवणे व अशा अनुज्ञप्त्यासंबंधी काही अन्य अधिकार जिल्हा पातळीवर प्रदान करणे.

संदर्भ:- १] शासनाचे गोपनीय इंग्रजी पत्र क्रमांक बीपीए १०८९/पीआरओ-२, दिनांक १८ फेब्रुवारी १९८९.

२] मुख्य सचिवांचे गोपनीय अ.शा. पत्र क्र. बीपीए १०८९/पीआरओ-३, दिनांक १८ फेब्रुवारी १९८९.

३] शासकीय परिपत्रक, गृह विभाग, क्रमांक एफएलआर ११८९/६[३]/पीआरओ-२, दिनांक २२ फेब्रुवारी १९८९.

४] शासकीय परिपत्रक, गृह विभाग, क्रमांक सीएलआर १०८९/३८२/२३/पीआरओ-३, दिनांक २२ फेब्रुवारी १९८९.

५] शासन अधिसूचना क्र. बीपीए १०८९/एक[रोमन] ते ७ [रोमन पीआरओ-२, दिनांक १७ फेब्रुवारी १९८९ अन्वये नियम व आदेश यामध्ये केलेल्या दुरुस्त्या.

Kept in the meeting of Divisional Officers on 20/7/89

वर उल्लेख केलेली पत्रे, परिपत्रके व अधिसूचना यांद्वारे [१] देशी व विदेशी दारूची नवीन दुकाने देणे, [२] अशा दुकानांसाठी अनुज्ञप्त्या देण्याचे अधिकार जिल्हा पातळीवर गठीत केलेल्या समितीस देणे, [३] नवीन दुकाने देण्याचा निर्णय घेतल्यामुळे जुन्या बंद पडलेल्या देशी व विदेशी दारूच्या किरकोळ विक्रीच्या अनुज्ञप्त्यांची पुनःस्थापना यापुढे न करणे, [४] किरकोळ विक्रीच्या दारू दुकानाचे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर न करणे, [५] देशी विदेशी दारूच्या

...२/-

किरकोळ विक्री दुकानाच्या अनुज्ञप्तीधारकांनी भागीदार घेणे/वगळणे यासाठी परवानगी देण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देणे, [६] परमीट रूम, बीअर बार, क्लब लायसेन्स व टेंपररी क्लब लायसेन्स देण्याचे अधिकार जिल्हा पातळीवर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीस देणे, [७] ताडी दुकानदारांना देशी दारू सीलबंद बाटलीत विकण्याचे परवाने देणे [सीएल/एफएल/टिओडी-तीन], [८] देशी दारू तयार करणारे अनुज्ञप्ती धारक यांनाच देशी दारूची घाऊक विक्रीची अनुज्ञप्ती द्यावी या नियमात बदल करून देशी दारूच्या घाऊक विक्रीसाठी स्वतंत्र परवाने देणे, [९] देशी व विदेशी दारूची किरकोळ विक्रीची दुकाने कोणत्या दिवशी बंद ठेवावीत या बद्दलच्या नियमात सुधारणा करणे इ. संबंधीचे शासनाचे निर्णय व संबंधीत नियमात केलेल्या दुरुस्त्या कळविण्यात आल्या होत्या. हे निर्णय कळविण्यात आल्यानंतर दिनांक १४ मार्च १९८९ रोजी बिनतारी संदेशाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना पुढील आदेश होईपर्यन्त विदेशी व देशी किरकोळ विक्रीसाठी नवीन परवाने देण्यासंबंधीच्या ज्या सूचना शासकीय परिपत्रक क्रमांक एफएलआर ११८९/६[३]/पीआरओ-२, दिनांक २२ फेब्रुवारी १९८९ व सीएलआर १०८९/३८२/२३/पीआरओ-३, दिनांक २२ फेब्रुवारी १९८९ यामध्ये दिल्या होत्या त्या सूचनांची अंमलबजावणी करु नये व देशी/विदेशी दारूच्या किरकोळ विक्रीसाठी एफएल-२ व सीएल-३ या दोन नमुन्यांमध्ये नवीन अनुज्ञप्त्या देण्याच्या संदर्भात पुढील सर्व कार्यवाही पुढील आदेश होईपर्यन्त स्थगित ठेवावी असे आदेश देण्यात आले होते. वरील सर्व बाबींचा शासनाने साकल्याने विचार केलेला असून आता याबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

[१] एफएल-२ व सीएल-३ या नमुन्यामध्ये अनुक्रमे विदेशी व देशी दारूच्या किरकोळ विक्रीसाठी नवीन अनुज्ञप्त्या सध्या देऊ नयेत. शासनाच्या या निर्णयानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी आता यापुढे वरील दोन नमुन्यांमध्ये नवीन अनुज्ञप्त्या देण्यासंबंधी अर्ज मागविणे वगैरे कोणत्याही प्रकारची कार्यवाही करु नये. शासनाच्या वर संदर्भ म्हणून अनु. [३] व [४] येथे नमूद केलेल्या दोन परिपत्रकामधील सूचना सध्या पुरत्या रद्द समजाव्यात.

[२] एफएल-२ व सीएल-३ या नमुन्यातील पूर्वी मंजूर केलेल्या परंतु प्रतिकूल पोलीस अहवाला व्यतिरिक्त इतर कारणामुळे प्रत्यक्षात न दिलेल्या किंवा प्रत्यक्ष अनुज्ञप्ती घेऊन धंदा सुरु केल्यानंतर काही कारणामुळे स्वत: अनुज्ञप्ती धारकानीच धंदा बंद करुन अनुज्ञप्तीचे नुतनीकरण केलेले नाही अशा परिस्थितीत जुन्या अनुज्ञप्त्यांची पुन:स्थापना करण्यासंबंधीचे जे अर्ज [एफएल-२ व सीएल-३ या अनुज्ञप्ती संबंधीचे] जिल्हाधिकारी कार्यालयात, आयुक्त, दारुबंदी व उत्पादन शुल्क यांच्या कार्यालयात वा गृह विभाग [दारुबंदी] मंत्रालय येथे जी प्रकरणे विचाराधीन होती अशा सर्व प्रकरणांबाबत शासनाच्या पूर्वीच्या धोरणानुसार जिल्हा पातळीवरील एफएल-३ या अनुज्ञप्त्या मंजूर करण्यासाठी जी समिती गठीत केलेली आहे, त्या समितीच्या शिफारशीनुसार जिल्हाधिकाऱ्यांनी अंतिम निर्णय घ्यावेत. या संदर्भात

...३/-

अनुसरावयाची मार्गदर्शक तत्वे सोबत जोडलेली आहेत [परिशिष्ट "अ"] त्याप्रमाणे या संदर्भात शासनाने पूर्वी काढलेल्या आदेशांच्या प्रतीही जोडल्या आहेत. [आदेशांचे क्रमांक व दिनांक परिशिष्ट "ड" येथील यादीत दिले आहे]. दिनांक १७ फेब्रुवारी १९८९ पर्यन्त प्रलंबीत असलेले अर्ज विचारात घेऊन त्यावर निर्णय घ्यावयाचा असल्यामुळे या संदर्भात कोणतेही नवीन अर्ज जिल्हाधिकाऱ्यांनी कोणत्याही परिस्थितीत स्विकारु नयेत. सीएल-३ अनुज्ञप्तींच्या पुन:स्थापनेसंबंधीचे अर्ज दिनांक ३० मे १९८६ नंतर स्विकारण्यात येऊ नयेत अशा सूचना पूर्वीच दिलेल्या असल्यामुळे देशी दारुच्या जुन्या अनुज्ञप्तींच्या पुन:स्थापनेविषयी ३० मे १९८६ पूर्वी जिल्हाधिकाऱ्यांकडे प्राप्त झालेले होते परंतु ज्यांवर अजूनही निर्णय झालेला नाही असे अर्ज अजून प्रलंबीत असण्याची शक्यता बरीच कमी आहे याचीही नोंद जिल्हाधिकाऱ्यांनी कृपया घ्यावी व सीएल-३ जुन्या नमुन्यांची पुन:स्थापना करताना प्रलंबीत असलेल्या अर्जांवर आता निर्णय घेण्यापूर्वी अर्ज मुदतीत प्राप्त झाला होता याची काटेकोरपणे चौकशी करुन खात्री करुन घ्यावी. एफएल-२ व सीएल-३ या नमुन्यात दिलेल्या जुन्या अनुज्ञप्तींची पुन:स्थापना करताना विचारात घ्यावयाचे अर्ज प्रामुख्याने ३ प्रकारचे असतील ते असे :-

१] दिनांक १७ फेब्रुवारी १९८९ रोजी जे अर्ज मंत्रालयामध्ये गृह विभाग [दारुबंदी] येथे प्रलंबीत होते व जे त्या त्या जिल्ह्यात परत पाठविण्यात आलेले आहेत.

२] १७ फेब्रुवारी १९८९ रोजी जे अर्ज आयुक्त, दारुबंदी व उत्पादन शुल्क कार्यालयात प्रलंबीत होते व जे जिल्हाधिकारी कार्यालयात परत पाठविण्यात आलेले आहेत.

३] १७ फेब्रुवारी १९८९ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात प्रलंबीत असलेले अर्ज.

[टिप: सीएल-३ अनुज्ञप्त्यांच्या पुन:स्थापनेचे प्रलंबीत अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयात ३० मे १९८६ पूर्वी प्राप्त झालेले असले पाहिजेत].

या तीन प्रकारच्या अर्जांवर वर उल्लेख केल्याप्रमाणे आता जिल्हाधिकाऱ्यांनी समितीच्या शिफारशीनुसार व सोबत जोडलेली मार्गदर्शक तत्वे विचारात घेऊन निर्णय घ्यावयाचा आहे [परिशिष्ट "अ"].

[३] सीएल-३ व एफएल-२ नमुन्यातील अनुज्ञप्त्यांचे स्थलांतर करु नये असे आदेश देण्यात आले होते. सध्या सीएल-३/एफएल-२ या नमुन्यात नवीन अनुज्ञप्त्या द्यावयाच्या नसल्यामुळे या अनुज्ञप्त्यांच्या स्थलांतरावर घातलेले निर्बन्ध उठविण्यात येत आहेत. सोबत जोडलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार [परिशिष्ट "ब"] जिल्हाधिकारी अशा प्रस्तावांचा विचार करुन त्यावर अंतिम निर्णय घेऊ शकतात.

[४] सीएल-३ व एफएल-२ अनुज्ञप्तीमध्ये भागीदार घेणे किंवा भागीदारीत अनुज्ञप्ती असल्यास एक वा अनेक भागीदारांची नावे अनुज्ञप्तीमधून कमी करणे व

अनुज्ञप्ती एका व्यक्तीच्या नावाकडून दुसऱ्या व्यक्तीच्या नावावर [illegible] करणे या बाबी आता जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या अधिकारात मंजूर करावयाच्या आहेत. सोबत जोडलेल्या परिशिष्ट "क" आणि "ड" मधील मार्गदर्शक तत्वानुसार या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनीच अंतिम निर्णय घ्यावयाचा आहे.

[५] ताडी दुकानदारांना ताडी दुकानातून देशी दारु सीलबंद बाटल्यांमध्ये विकण्याची अनुज्ञप्ती देण्यासंबंधीचा शासनाचा पूर्वीचा निर्णयही शासनाने स्थगित केलेला असून १९८९ च्या ताडी कामामध्ये व त्यानंतर नव्याने देण्यात येणाऱ्या ताडी दुकानाच्या परवानाधारकांना [लिलाव वा अन्य पध्दतीने] देशी दारु सीलबंद बाटल्यातून विकण्याचे परवाने [सीएल/एफएल/टिओडी-३] देऊ नयेत. ताडी दुकानांच्या लिलावासाठी जाहिरनामा काढताना अशी देशी दारु विकण्यास [illegible] परवाने दिले जातील अशा प्रकारचा उल्लेख जाहिरनाम्यामध्ये केला जाऊ नये. कारण असे जोड परवाने दिले जाऊ नयेत असे शासनाचे धोरण आहे.

[६] परमीट रुम व बीअर बार यांच्या अनुज्ञप्त्या, क्लब लायसेन्सेस, टेंपररी क्लब लायसेन्सेस जिल्हाधिकाऱ्यांनी समितीच्या शिफारशीनुसार व शासनाने या पूर्वीच कळविलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार द्यावयाच्या आहेत.

वरील अनुक्रमांक [१] ते [६] येथे नमूद केलेल्या सूचना व्यतिरिक्त इतर बाबतीत पूर्वीच्या सूचनांनुसार कार्यवाही करावयाची आहे.

[ सं. कृ. जांबवडेकर ]
सह सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग

## परिशिष्ट "ब"

किरकोळ विक्री

### देशी / विदेशी दारू दुकानाच्या स्थलांतराबाबतचे प्रस्ताव

असे प्रस्ताव विचारात घेताना पुढील मार्गदर्शक तत्वे घातलेली आहेत :-

१] एका तालुक्यातून दुसऱ्या तालुक्यात स्थलांतरास परवानगी नाही.

२] खेडेगावातील देशी/विदेशी दारूचे दुकान नगरपालिका /महानगर पालिका असलेल्या ठिकाणी स्थलांतरीत करण्यास परवानगी देऊ नये.

३] एका नगरपालिकेच्या हद्दीतून दुसऱ्या नगरपालिकेच्या हद्दीत जरी असे ठिकाण एकाच तालुक्यात असली तरी तेथे दुकान बदलून देण्यात येऊ नये.

४] जर महापालिकेच्या किंवा नगरपालिकेच्या विस्तारीत हद्दीत समाविष्ट करण्यात आलेल्या सीमा क्षेत्रातील हे क्षेत्र पूर्वी ग्रामीण भाग असताना दिलेले दुकान असेल तर ते शहराच्या मूळ हद्दीत असलेल्या कोणत्याही ठिकाणी बदलून देण्यास अनुमती देऊ नये.

५] जेथून दुकान स्थलांतरीत करण्यात येते त्या ठिकाणी देशी/विदेशी दारू पिण्याची गैरसोय न व्हावी.

६] नव्या ठिकाणी स्थलांतरीत करण्यात येणाऱ्या दुकानाची जागा सर्व दृष्टीने योग्य असावी.

७] नव्या ठिकाणी स्थलांतरीत करण्यात येणाऱ्या दुकानाची जागा अंतर निर्बन्ध [ ७५ मीटर ] मुक्त असावी.

८] ज्या गावात दुकान स्थलांतरीत करावयाचे आहे त्या गावच्या ग्रामपंचायतीने ग्रामसभा घेऊन ना हरकत प्रमाण पत्र देणे आवश्यक आहे. त्या गावच्या ग्रामसभेचे ना हरकत प्रमाण पत्र नसल्यास तेथे दुकान स्थलांतर करण्यात परवानगी देऊ नये.

९] ज्या नवीन जागेत दुकान स्थलांतरीत करावयाचे आहे त्या जागेचे बांधकाम अधिकृत असल्याबद्दलचा दाखला सक्षम [तत्संबंधी] अधिकाऱ्याने दिलेला असला पाहिजे.

क्रमांक सीएलआर १९८९/१५६०/पीआरओ-३,
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक ७/८/८९

प्रति,
आयुक्त, दारूबंदी व उत्पादन
शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय - सीएल-३ अनुज्ञप्तींच्या स्थलांतराबाबत.

अधीक्षक, दारूबंदी व उत्पादन शुल्क, ठाणे यांनी त्यांचे दिनांक २९ जुलै, १९८९ चे पत्र क्रमांक न. एलआर ११८९/६२४९/८९ अन्वये खालील मुद्यांवर खुलासा करण्याची विनंती शासनास केली आहे -

१] अनुज्ञप्ती नगरपरिषदेच्या मूळ हद्दीत असल्यास ती विस्तारीत हद्दीत स्थलांतर करण्यावर निर्बन्ध नाहीत.

२] तसेच एका विस्तारीत भागातील अनुज्ञप्ती दुसऱ्या विस्तारीत भागात स्थलांतर करण्यावरही निर्बन्ध नाहीत.

२. उपरोक्त मुद्यांच्या अनुषंगाने मला आपणास असे कळविण्याचे निदेश आहे की, शासन पत्र, गृह विभाग, क्र. सीएलआर १९८३/५१३४/पीआरओ-३, दिनांक २७.४.१९८५ च्या शासन पत्रान्वये सीएल-३/एफएल-२ अनुज्ञप्त्या स्थलांतर करण्याबाबत निर्बन्ध लर्ड ठरविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे सध्या जिल्हा स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या समितीला सीएल-३/एफएल-२ अनुज्ञप्त्या स्थलांतर करण्यास सक्षम ठरविण्यात आले आहे व त्यांना दिनांक ८.७.१९८९ रोजी याबाबत मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. त्यामध्ये वर परिच्छेद २[१] व [२] मधील उल्लेख केलेल्या स्थलांतरास निर्बन्ध असल्याचा उल्लेख नाही. म्हणून अशा तऱ्हेच्या स्थलांतरास हरकत नाही.

[signature]

[ स. म. जांबवडेकर ]
सह सचिव, गृह विभाग,
महाराष्ट्र शासन.

प्रत, माहितीसाठी अग्रेषित -

सर्व जिल्हाधिकारी.

सर्व अधीक्षक, दारूबंदी व उत्पादन शुल्क.